Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थीनीला राज्यस्तरीय ßकृषीथॉन गुणवंत कृषी विद्यार्थीÞ पुरस्काराने सन्मानित

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ संलग्नित वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथील कु. वैष्णवी दिवाकर मुंडवाईक कृषी जैवतंत्रज्ञान शाखेतील चतुर्थ वर्षाची विद्यार्थी असून त्यांना "कृषीथॉन उत्कृष्ट गुणवंत कृषी विद्यार्थी" पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. युवकांचा कृषी श्रेत्रातील सहभाग वृदधींगत व्हावा या उदेद्शाने कृषी शिक्षणात नैपुण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव हयुमन सर्व्हिस फाऊंडेशन आणि मिडिया एक्झिबिटर्स, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय कृषीथॉन कृषी प्रदर्शनात गुणवंत कृषी विद्यार्थी पुरस्कारासाठी महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातुन प्राप्त झालेल्या ३५०० प्रस्तावापैकी ४२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. कृषी महाविद्यालयात अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या कृषी विस्तार, संशोधनाबरोबरच सामाजिक, सांस्कृतीक, ग्रामविकास आदी. श्रेत्रात सक्रिय सहभागी असणाऱ्या उपक्रमाशी अशा विद्यार्थ्यांना "कृषीथॉन उत्कृष्ट गुणवंत कृषी विद्यार्थी" पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर इफको लि. नवी दिल्लीच्या व्यवस्थापक साधना जाधव, माजी कृषी अधिक्षक अधिकारी श्री. प्रकाश सांगळे, हयुमन सर्व्हिस फाऊंडेशन आणि मिडिया एक्झिबिटर्स, संजय न्याहाकर, द्राक्ष विज्ञान मंडळ नाशिकचे अध्यक्ष डॉ. वसंत टिकले, मिलिंद मुर्गेकर, मनिषा लांडे, उपस्थित होते. या उत्कृष्ट यशासाठी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. एन. डि. पार्लावार यांनी वैष्णवी मुंडवाईक हिचे अभिनंदन केले. तिने या यशाचे श्रेय आई – वडिल व महाविद्यालयातील प्राध्यापकांना दिले आहे,